नि.फौ.ख. क्र. १८६/२०१७
निशाणी क्र. २७

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** - नामदेव खंडु कणसे
**वय** - ५१ वर्षे, **व्यवसाय** – पान टपरी
**राहणार** - तिसगाव वाडी, ता. राहाता, जि. अहमदनगर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. महाले यांचे मार्फत -</u>**

मी सन १९८२ पासुन पान टपरीचा व्यवसाय करतो. माझे दुकान बाभळेश्वर चौकात आहे. सन २०१७ मध्ये माझे शिवगंगा पान स्टॉल होते. दि. १९.०५.२०१७ रोजी माझे पान दुकान चोराने फोडले होते. त्याबाबत मला वॉचमन नासिर शेख यांनी रात्री ०२.०० वाजता फोन करुन माहिती दिली होती. मला त्यांनी तुमचे दुकान फोडले आहे अशी माहिती दिली होती. त्या दिवशी मी दिवसा बाहेर गावी गेलो होतो व रात्री घरी परत आलो. फोन आल्यानंतर मी पान टपरी जाऊन पाहिली असता मला पान टपरी फोडली असल्याचे व टपरीतील सामान चोरी झाल्याचे त्यांना दिसले. त्यावेळी तेथे पोलीसांची गाडी आली व पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला नेले व तेथे मी तक्रार नोंदवली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी असुन त्यातील मजकुर सत्य व बरोबर आहे. **फिर्यादीस व प्रथमखबरी अहवालास नि.क्र. २८ व २९** देण्यात आला.

२. चोरीमध्ये माझ्या दुकानातील बीडी, सिगारेटचे पाकीटे व दुकानातील इतर माल अंदाजे रक्कम रुपये दिड हजाराचा व रोख रक्कम रुपये जवळपास पाच हजार चोरीला गेले होते. वॉचमन नासिर याने आरोपीचे नाव पोलीसांना सांगितले होते. आरोपी पोलीस स्टेशनला आला व त्याने चोरीला गेलेला माल पोलीसांना दिला.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपासणी आरोपीकरिता अधिवक्ता श्री. ए.बी.पाळंदे यांचे मार्फत -</u>**

३. मी सध्या आईसक्रीम विक्रीचा व्यवसाय करतो. फिर्याद दिली त्यावेळी मी पान टपरीचा व्यवसाय करत होतो. मी माझ्या पान टपरीबाबत लेखी दस्त पोलीसांना दिला नाही. माझ्या टपरीची ग्रामपंचायतला नोंद होती. त्याचा दस्त मी पोलीसांना दिला नाही. पान टपरी बनवल्या बाबतचा पुरावा मी पोलीसांना दिला नाही. पान टपरी कोणत्या गट क्रमांकात होती ते मी सांगु शकत नाही. पान टपरीचे लायसन्स त्यावेळी माझ्याकडे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की पान टपरीचा व्यवसाय मी परवानगी शिवाय चालवत होतो. घटनेच्या वेळी वॉचमन नासिरचा फोन आल्याबाबतचे कॉल रेकॉर्ड मी पोलीसांना दिले नाही. घटनेच्या वेळी अंधार होता. मी घटनास्थळी नव्हतो. मी घटनास्थळी जाण्यासाठी साधारणत: एक तासाचा वेळ लागला. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीला प्रत्यक्ष चोरी करताना पाहिले नाही. मी आरोपीला पुर्वीपासुन ओळखतो. नासिर हा बाभळेश्वर गावचा रहिवासी आहे. नासिर व आरोपीचे काय संबंध आहे याबाबत मला माहिती

नाही. माझ्या पान टपरीच्या आजुबाजुला इतर दुकाने होती. मला चोरी गेलेल्या नोटांचे क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की रक्कम माझी असल्याबाबत माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की चोरी गेलेल्या मालाची पावती मी पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की पान टपरीतील माल सहज सोबत घेऊन जाता येतो. हे म्हणणे खरे नाही की चोरीला गेलेला माल माझा नसल्यामुळे मी माल परत मिळणेसाठी अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की चोरी गेलेला माल माझा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**(पंकज रा. फुलारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

ठिकाण:राहाता
दिनांक:२७.११.२०२५